
# रानबोली




**प्रकाशक व लेखक – श्री. राजीव पंडित**
**पृष्ठ संख्या २२४ (किं. रु. ४००/–मात्र)**

निसर्गात मनसोक्त भटकंती करणे, वन्यजीव जंगलात प्रत्यक्ष जाऊन पाहण्याचा आनंद घेणारे अनेकजण असतात. आपली ही आवड जोपासत असताना निसर्गात आलेले अनुभव अगदी प्रांजळपणे सांगणारे राजीव पंडित हे रानबोली या पुस्तकाचे लेखक आहेत. पुस्तक वाचताना लक्षात येते की ते डोळसपणे ही भटकंती करतात. हे अनुभव इतके पारदर्शी आहेत की अनुभव ऐकणाऱ्या व्यक्तीला निसर्ग पर्यटनाची ओढ लागेल.

३० जुलै २०२३ रोजी डॉ. संजीव नलावडे यांच्या हस्ते प्रकाशित झालेले हे पुस्तक जय ॲडव्हर्टायझिंग यांनी मुद्रित केले आहे. डॉ. संजीव नलावडे हे स्वत: प्राणी, वनस्पती या विषयातील तज्ज्ञ आहेत. मुखपृष्ठावरील राजबिंड्या वाघाचे देखणे प्रकाशचित्र श्री. मोहन थॉमस यांचे आहे तर मलपृष्ठावर पुण्यातील वनस्पती शास्त्रज्ञ व कवी डॉ. मंदार दातार यांची समर्पक कविता आहे. ग्लोबल टायगर फोरमचे जनरल सेक्रेटरी श्री. राजेश गोपाल यांची प्रस्तावना आहे. प्रस्तावना छोटी आहे पण ती वाचत असताना पुस्तकातील आशयाचा कानोसा सहज मिळतो. पुस्तक वाचण्याची उत्कंठा वाढते. प्रस्तावनेनंतर लेखकांनी या पुस्तकाची पार्श्वभूमी सांगताना त्यांच्या लहानपणी निसर्गाशी निर्माण झालेली जवळीक आणि महाविद्यालयीन काळात घेतलेले ट्रेकिंगचे अनुभव थोडक्यात सांगितले आहेत. निसर्गाशी सख्य वाढल्याने 'शहाणे करून सोडावे सकळ जन' या उक्तीनुसार मार्गदर्शनपर शिबिरेही घ्यायला सुरुवात केली.

जंगलात अनेकजन जाऊन येतात. जंगलाची होणारी हानी पाहून काहीजण हळहळतात, काहीजण समविचारी व्यक्तींना सोबत घेऊनही हानी होऊ नये म्हणून प्रयत्न करतात. राजीव पंडित हे यांपैकीच एक आहेत. निसर्गात भ्रमंती करणे सोपे आहे परंतु निसर्गाकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी विकसित करावी लागते. यासाठी काही अभ्यासक्रम लेखकांनी पूर्ण केले. हे करत असताना या क्षेत्रातील अनेक दिग्गज आणि अनुभवी व्यक्तींचा सहवास लाभल्याने सतत शिकत राहण्याची वृत्ती तयार होत गेली. जे आपण अनुभवले, जाणून घेतले याचा प्रसार करण्यासाठी 'जीविधा' या संस्थेची स्थापना केली. अनेकजण जंगलात जाऊन वाघ, सिंह, बिबट्या, यांसारख्या वन्यजीवांच्या दर्शनाला उत्सुक असतात पण या वन्यजीवांव्यतिरिक्त अनेक प्राणी, पक्षी वनस्पती हे देखील खूप महत्वपूर्ण आहेत याची जाणीव पुस्तक वाचताना होते. पुस्तकाची पार्श्वभूमी सांगितल्यानंतर ऋणनिर्देश लिहिताना सर्व सहकाऱ्यांसह आपल्या पत्नीचाही उल्लेख कृतज्ञतापूर्वक केला आहे. आपले अनुभव राजीव पंडित यांनी स्वाती पेशवे यांना सांगितले. पेशवे यांनी शब्दांकन केल्यानंतर नीलिमा सहस्त्रबुध्दे यांनी या लेखांवर संस्करण केले आहे. मुळात अनुभवच इतके डोळसपणे घेतलेले आहेत, त्यावर आपल्या धारणेनुसार जे विचारमंथन केले आहे ते इतके छान आहे की वाचक पुस्तक वाचताना

खिळून राहतो.

पुस्तकात नुसतेच अनुभव कथन नाही तर जोडीला ज्या पक्षी, प्राणी, वनस्पती, ठिकाण यांची उल्लेख आहे, त्यांची प्रकाशचित्रे आहेत. सर्व प्रकाशचित्रे आहेत. सर्व प्रकाशचित्रे राजीव पंडित यांची नसून अनेकांचा यात सहभाग आहे. काही ठिकाणी देविदास पेशवे यांच्या सुरेख चित्रांनी लेख परिपूर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे अनेक पशुपक्ष्यांचे, ठिकाणाचे प्रकाशचित्र लेखात ज्या ठिकाणी आहे त्या सर्व प्रकाशचित्रांवर त्या वन्यजीवांचे, ठिकाणांचे उल्लेख नाहीत. प्रकाशचित्र कोणी काढले याबाबत नामनिर्देश आहे. तरीही लेख वाचताना आपण तो वन्यजीव, ते ठिकाण बरोबर ओळखतो. सुरूवातीस माझे लहानपण हा एक छोटासा लेख आहे. विविध विषयांवर एकूण १६ प्रकरणे पुस्तकात आहेत. उदा. व्याघ्रदर्शन, हत्तीची जान पहचान, जलचर सस्तन प्राणी, अविस्मरणीय पौर्णिमा, इ. वाचकाला ज्या विषयात रस असेल त्यांनी त्या प्रकरणापासून वाचनास सुरुवात करावी. लिखाणात प्रवाहीपण असल्याने वाचताना प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. महत्वाचे हे की, अगदी सुरूवातीस जंगलात गेल्यानंतर अनुभव गाठीशी नसेल तर घडलेल्या चुकांची प्रामाणिकपणे कबुली दिली आहे. अनुभवलेल्या चुकांतून प्रसंगातून शिकण्याच्या वृत्तीमुळे वाचकांसाठी सावधगिरीच्या सूचनाही लेखक सहज देतात. कोणत्या जंगलात कोणते प्राणी असतात. त्या जंगलाचे किती भाग पडतात, त्यांची नावे ही त्या ठिकाणच्या बोलीभाषेतील शब्द असतात, त्यांचे अर्थ, कोअर झोनबाबत माहिती, तेथील गाईडस्, वनरक्षक यांचे जीवन, वाघांचे नामकरण करण्याची पध्दत अशा अनेक माहितीवर लेखक प्रकाशझोत टाकतात.

कोणी तरी असतं तिथं या गुढ नावाच्या प्रकरणात जंगलात वावरताना समोर येऊ शकणारे धोके, तेव्हा घ्यावयाची काळजी याबाबत अनुभवांच्या माध्यमातून सविस्तर भाष्य केले आहे. पन्ना व्याघ्र प्रकल्पात कर्णावती नदी वाहते. इंग्रजांना कर्णावती हा उच्चार करता येत नसल्याने त्यांनी या नदीचे नाव केन रिव्हर असे ठेवले. आपण मात्र कर्णावती असाच उच्चार करायला हवा असे लेखक सांगतात. जंगलातील अनुभव कथन करत असताना आलेल्या बिकट प्रसंगातून, संकटातून संभावना कशी विकसित होत गेली हे सांगतात. पाळीव हत्तीबद्दल माहिती वाचताना लेखकाची संवेदनशीलता आपल्या मनात झिरपते आपण बरेचदा अज्ञानामुळे काही अयोग्य उच्चार करतो. उदा. खारदुंगला पास. खरंतर लड़ाखी भाषेतला या एकाक्षरी शब्दाचा अर्थ खिंड असा आहे. त्यामुळे खारदुंगला इतके म्हणणे पुरेसे असते. अशा बारीकसारीक पण महत्वपूर्ण नोंदी लेखक सांगतात. थोडक्यात पण आशयघन शब्दात जंगल, वन्यजीव, पाळीव प्राणी, पक्षांची निरीक्षणे याबाबत माहिती या पुस्तकात मिळते. काही विशेष माहिती वेगळ्या चौकटीत लिहिली आहे.

हे पुस्तक वाचत असताना आपण माणसं वाचतो, पक्ष्यांच्या सवयी वाचतो, पशुंचे वर्तन वाचतो, वनस्पती वाचतो इतकेच नाही तर ठिकाणेही वाचतो. उत्क्रांती होत असताना पशु पक्ष्यांच्या शरीरामध्ये झालेल्या बदलांची माहिती सहज मिळते. जंगलातील गाईड्सना प्रशिक्षण देण्याची संधी लेखक व त्यांचे मित्र श्री.अनुज खरे यांना मिळाली. कोरोना काळात या जोडगोळीने जंगलातील गाईडसाठी खूप मदतकार्य केले आहे. शेवटचे प्रकरण वाचून माणुसकी अजून जिवंत आहे याची जाणीव होते. जंगल भ्रमंतीस सुरुवात करणाऱ्या, सुरुवात केलेल्या अशा सर्वांसाठी हे पुस्तक अनुभवांची शिदोरी पुरवते.

◆

**मनीषा चंद्रशेखर पाठक**
मोबा. ९४२०४८१३१७